# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९९०९३
ई-मेल: moh@mbmc.gov.in

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि/ १०३९ /२०२५-२६ दिनांक:- १२/०८/२०२५

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- "रुग्ण हक्कांची संहिता" मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, आपणांस कळविण्यात येते की महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारीत) नियम २०२१ च्या नियम क्र. ११ (क्यु) अन्वये रुग्णहक्क संहिता खालीलप्रमाणे रुग्णालयात दर्शनी भागात प्रदर्शित करावयाच्या सूचना देण्यात आले आहेत.

तरी सदर "रुग्ण हक्कांची संहिता" खालीलप्रमाणे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावीत.

11 (क्यु) रुग्ण हक्क संहिता. शुश्रुषागृहात दाखल रुग्णांना पुढीलप्रमाणे हक्क असतील :-

(अ) रुग्णाच्या आजाराबाबतची माहिती, आजाराचे स्वरूप, आजाराचे कारण, प्रस्तावित उपचार, घ्यावयाची काळजी, उपचाराचे अपेक्षित परिणाम, अपेक्षित गुंतागुंतीची शक्यता व उपचाराचा अपेक्षित खर्च इत्यादी माहिती जाणून घेण्याचा हक्क रुग्णास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अथवा त्याच्या जवळच्या नातेवाईकास असेल.

(ब) स्त्री रुग्णाची तपासणी महिलेच्या उपस्थितीत केली जाईल.

(क) एच.आय.व्ही./एड्स झालेल्या व्यक्तीस उपचार व देखभालीचा हक्क असेल.

(ड) रुग्णाला संबंधित शुश्रूषागृहाच्या स्वागत कक्षात ठेवलेल्या तक्रार नोंदवहीत तक्रार लिहिण्याचा अधिकार असेल.

(इ) शुश्रुषागृहात कार्यरत वैद्यांचे नाव, त्यांची शैक्षणिक अर्हता, भारतीय वैद्यक परिषद / महाराष्ट्र वैद्यक परिषदेचा नोंदणी क्रमांक आणि त्याचा वैधता दिनांक दर्शविणारी यादी शुश्रुषागृहाच्या स्वागत कक्षाजवळ ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी असेल.

(फ) दुसरे मत (Second-opinion) घेण्याचा हक्क रुग्णाला असेल. यासाठी आवश्यक सर्व वैद्यकीय चाचण्यांचे अहवाल रुग्णास अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस उपलब्ध करून दिले जातील.

(ग) शुश्रुषागृहातील दाखल रुग्णाला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस त्याचे वैद्यकीय अभिलेख नेहमी उपलब्ध असतील. आंतररुग्ण कागदपत्रांची छायांकित प्रत मागणीनुसार उपलब्ध असेल.

(ह) रुग्णाला सुट्टी देताना रोगनिदान, वैद्यकीय निष्कर्ष, चाचण्यांचे अहवाल, दिलेले उपचार, सुट्टी देतेवेळी रुग्णाची स्थिती व पुढील सल्ला याचा उल्लेख असलेले डिस्चार्ज कार्ड दिले जाईल.

(आय) पुरविण्यात येणाऱ्या सेवा, विविध उपचार, त्यांचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे दर विस्तृतपणे दर्शविणारे दरपत्रक अथवा अनुसूची- III मध्ये नमूद केलेल्या विशिष्ट दराची यादी छापील स्वरूपात शुश्रुषागृह मुख्य दर्शनी भागात ठळकपणे लावेल, मात्र सदर दर शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या दराशी सुसंगत असेल.

(जे) दाखल करतानाच्या हमीपत्रानुसार संबंधित शुश्रूषागृहाने प्रदर्शित केलेल्या दरपत्रकानुसार दिलेल्या आरोग्य सेवेबाबतच्या देयकाची प्रतिपूर्ती करण्याची जबाबदारी संबंधित रुग्ण व त्याचे नातेवाईक यांची राहील.

(के) आरोग्य सेवा पुरवठादार आणि वैद्यक यांच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची हिंसा करण्यास रुग्ण किंवा त्याचे नातेवाईक यांना प्रतिबंध असेल. तसेच रुग्ण व त्याचे नातेवाईक शुश्रूषागृहाच्या स्वच्छता व सुरक्षाविषयक नियमांचे पालन करतील.

Scanned with OKEN Scanner

## अनुसूची – III

[नियम 11-क्यू (आय) नुसार]

**शुश्रुषागृहात प्रदर्शित करावयाचे दरपत्रक**

(1) प्रवेश शुल्क
(2) प्रतिदिन आंतररुग्ण दर (खाट / अतिदक्षता कक्ष)
(3) वैद्य शुल्क (प्रति भेट)
(4) सहायक वैद्य शुल्क (प्रति भेट)
(5) भुल शुल्क (प्रति भेट)
(6) शस्त्रक्रियागृह शुल्क
(7) शस्त्रक्रियागृह सहायक शुल्क
(8) भुल सहायक शुल्क (प्रति भेट)
(9) शुश्रुषा शुल्क (प्रति दिन)
(10) सलाईन व रक्त संक्रमण शुल्क
(11) विशेष भेट शुल्क
(12) मल्टिपॅरा मॉनिटर शुल्क
(13) पॅथॉलॉजी शुल्क
(14) ऑक्सिजन शुल्क
(15) रेडिओलॉजी व सोनोग्राफी शुल्क.

**(डॉ. प्रमोद पडवळ)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



Scanned with OKEN Scanner